Total No. of Printed Pages: **06** | No. of Questions : **50**

**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Chhatrapati Sambhajinagar**
**PET 2024 (9022) Doctor of Philosophy(Marathi)**

(To be filled by the Candidate)

Candidate Seat Number
(As per Admit card)

OMR Sheet Number

Invigilator's signature with Date

Candidate's Seat No. in Words :________________________________________

Name of the Center :________________________________________

Paper Code & Name of Examination : **9022- Doctor of Philosophy(Marathi)**

Date: **03/10/2024** **PET 2024 - EXAMINATION**

Time: **One Hours** Total Marks: **100**

**Important Instructions for the candidate**

1. Write your seat number and OMR Sheet number on the question paper in the earmarked space
2. This question paper carries Fifty (50) Multiple-choice type questions and each question carries 2 Marks
3. At the commencement of examination, the question paper will be given to the student.
4. Each question has four alternative responses marked (A) (B) (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each question Example: where (C) is correct answer

   (A) (B) ● (D)

5. Your responses to the answer are to be indicated in the OMR Sheet. If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet it will not be evaluated.
6. Rough work is to be done at the end of this question paper.
7. You have to return OMR answer sheet and question paper to the invigilator at the end of examination compulsorily and must not carry with you outside the examination hall.
8. Use only Black / Blue ball point pen
9. Use of any type of calculator or log table etc. is prohibited.
10. There is no negative marking for incorrect answers

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परीक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात तसेच आपणास दिलेल्या उत्तर पत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. या प्रश्नपत्रिकेतील सर्व प्रश्न सोडवणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A) (B) (C) (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत, त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा निळा करावा.
   उदा: जर (C) हे उत्तर योग्य असेल तर

   (A) (B) ● (D)

5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे ओएमआर उत्तर पत्रिकेतच दर्शवावीत इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. प्रश्नपत्रिकाच्या शेवटी कोऱ्या जागेवरच कच्चे काम करावे
7. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्यांनी मूळ ओ. एम. आर उत्तरपत्रिका पर्यवेक्षकाकडे परत करणे आवश्यक आहे तथापि प्रश्नपत्रिका व ओ. एम. आर. उत्तरपत्रिका आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्याला परवानगी नाही.
8. फक्त काळ्या किंवा निळ्या बॉलपेनचाच वापर करावा
9. कॅल्क्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही
10. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही

Q. No. Question

1. भरतमुनींच्या 'नाट्यशास्त्र' ग्रंथावरील अभिनवगुप्तने कोणता टीकाग्रंथ लिहिला?
   (A) रसभारती (B) अभिनयभारती
   (C) अभिनयरसशास्त्र (D) रसोत्कटशास्त्र

2. "लेखक कलेचा उपासक आहे, तो शंकराचार्याचा चोपदार नाही" असे मत कोणी मांडले?
   (A) ना. सी. फडके (B) के. ना. वाटवे
   (C) गंगाधर पाटील (D) वि. स. खांडेकर

3. 'मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र पुन: स्थापना' या समीक्षा ग्रंथाचे लेखक कोण आहेत?
   (A) वा. ल. कुलकर्णी (B) गो. म. कुलकर्णी
   (C) द. भि. कुलकर्णी (D) कृ. पां.कुलकर्णी

4. दिनकर दत्तात्रय भोसले यांनी कोणत्या टोपण नावाने लेखन केले आहे?
   (A) दिवाकर (B) चारुता सागर
   (C) द. ता. भोसले (D) दिवाकर कृष्ण

5. "दलित आत्मकथा म्हणजे वेदना पचवून प्रगल्भ झालेल्या व्यक्तिमनाचा विकास पावत गेलेला आलेखच होय." असे कोणी म्हटले?
   (A) भालचंद्र फडके (B) बाळकृष्ण कवठेकर
   (C) यशवंत मनोहर (D) राजा ढाले

6. अश्वविद्येची माहिती असणारा 'शालिहोम' हा ग्रंथ कोणी लिहिला?
   (A) रेणुकानंदन (B) कृष्णदास मुद्गल
   (C) रामा जनार्दन (D) महालिंगदास

7. तूप, अनरसा, राळे, गदारोळ हे शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आले आहेत?
   (A) अरबी (B) तेलगू
   (C) कानडी (D) तुर्की

8. 'सिंधू ते बुद्ध : अज्ञात इतिहासाचा शोध' हा बृहद्ग्रंथ कोणी सिद्ध केला आहे?
   (A) रमेश इंगळे उत्रादकर. (B) रवींद्र इंगळे चावरेकर
   (C) ब्रह्मानंद देशपांडे (D) पंडित विद्यासागर

9. मराठीमध्ये आदिबंधात्मक समीक्षेची तात्त्विक चर्चा कोणी केली?
   (A) गंगाधर गाडगीळ (B) म. सु. पाटील
   (C) गंगाधर पाटील (D) म. सु. पगारे

10. संशोधकाने संशोधन विषयाची निवड प्रामुख्याने कोणत्या बाबीवर करावी?
    (A) समस्येची समर्पकता (B) उपलब्ध निधी
    (C) मार्गदर्शकाचे मत (D) ग्रंथांच्या उपलब्धतेवर

11. संशोधन लेखाच्या सुरुवातीस काय लिहिणे अपेक्षित आहे?
    (A) संक्षेप (B) सारांश
    (C) उद्दिष्टे (D) प्रस्तावना

12. घटनाशास्त्रीय संशोधनाला कोणते संशोधन म्हणतात?
    (A) रुपविवेचनवादी (B) लोकपद्धती शास्त्र
    (C) स्वाभाविक निरीक्षण (D) आशय विश्लेषण

13. भाषा व साहित्य संशोधनात संदर्भ नोंदविण्याची .......... पद्धती प्रचलित आहे.
    (A) Bibliography (B) MLA style
    (C) Style Guide (D) Ibid

14. संशोधनातील सिद्धांतासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट कोणती आहे?
    (A) परिकल्पना (B) गृहीतके
    (C) सामान्यीकरण (D) समस्येचे स्पष्टीकरण

15. समस्यात्मक बालकांच्या शैक्षणिक प्रगतीमधील अडचणी अभ्यासण्यासाठी कोणत्या संशोधन पद्धतीचा उपयोग होतो?
    (A) सर्वेक्षण (B) प्रायोगिक
    (C) व्यक्ती अभ्यास (D) वांशिक

16. महात्मा फुलेंचे स्त्री शिक्षणातील योगदान हा ---------- संशोधनाचा विषय आहे.
    (A) उपयोजित (B) सर्वेक्षण
    (C) ऐतिहासिक (D) प्रायोगिक

17. ............ संशोधनात वर्तमानकालीन घटनांचे वर्णन/स्पष्टीकरण केले जाते.
    (A) प्रायोगिक (B) ऐतिहासिक
    (C) सर्वेक्षण (D) उपयोजित

18. संशोधनाची अवगामी विचार पद्धती .......यांनी मांडली.
    (A) प्लेटो (B) ॲरिस्टॉटल
    (C) जॉन ड्युई (D) रॉजर बेकन

19. ‘दैवतकथा’ साठी ‘दिव्यकथा’ ही सज्ञा कोणी वापरली
    (A) मा.गो. चाफेकर (B) रमेश देवरे
    (C) दि.के.बेडेकर (D) सुरेश चिखले

20. ‘हुईक’ हा विधी कोणत्या समाजाशी निगडित आहे?
    (A) मांग (B) धनगर
    (C) मराठा (D) बंजारा

21. ‘स्थंडिल संप्रदाय’ असा शब्द प्रयोग कोणी केला?
    (A) प्रभाकर पाध्ये
    (B) भा.रा. तांबे
    (C) वा.रा. कांत
    (D) बा. भ. बोरकर

22. श्री. ना. पेंडसे यांनी कोणती कादंबरी डायरीच्या स्वरूपात लिहिली आहे ?
    (A) कलंदर
    (B) रथचक्र
    (C) लव्हाळी
    (D) यशोदा

23. मराठी साहित्यातील कोणत्या कादंबरीकारास ‘लोकमानसविन्मुख कादंबरीकार’ असे संबोधले आहे ?
    (A) पु. शि. रेगे
    (B) उध्दव शेळके
    (C) भा. द. खेर
    (D) गेगाधर गाडगीळ

24. लक्ष्मीबाई टिळकांचा ‘आधुनिकांच्या आद्य कवियित्री’ असा निर्देश कोणी केला ?
    (A) ना.वा.टिळक
    (B) पु.शि.रेगे
    (C) भ. श्री. पंडित
    (D) प्र.के.अत्रे

25. वि.वा. शिरवाडकर यांची ‘दूरचे दिवे’ ही नाट्यकृती कोणत्या नाटकावर बेतलेली आहे?
    (A) अथेल्लो
    (B) हॅम्लेट
    (C) मॅक्बेथ
    (D) आयडियल हजबंड

26. गोपीनाथ तळवलकरकृत ‘आनंदभुवन’ या चरित्रग्रंथाचे चरित्रनायक कोण आहेत ?
    (A) पंडित नेहरू
    (B) म. गांधी
    (C) म. फुले
    (D) बाबासाहेब आंबेडकर

27. अगदी जवळच्या दोन ध्वनीमधला भेद अर्थनिर्णायक ठरत असेल तर त्यास ------- म्हणतात?
    (A) व्यवच्छेदक विनियोग
    (B) वैकल्पिक विनियोग
    (C) पूरक विनियोग
    (D) काटकसरीचे तत्व

28. पारंपरिक पध्दतीने ज्यास वाच्यार्थ असे म्हटले जाते त्यास ------- असे म्हणतात ?
    (A) भावपर अर्थ
    (B) सांकल्पनिक अर्थ
    (C) साहचर्यपर अर्थ
    (D) व्यंग्यार्थ

29. पाठचिकित्सा’ या शब्दासाठी ‘पाठसंशोधन’ असा शब्द कोणी योजला ?
    (A) जयश्री पाटणकर
    (B) श्री. ना. बनहट्टी
    (C) वि.भि. कोलते
    (D) सदा क–हाडे

30. --------- मांडणी हा संशोधनाचा प्रारंभ असतो तर निष्कर्ष हा शेवट असतो?
    (A) प्रबंधांग
    (B) संदर्भ
    (C) अभ्यूपगमाची
    (D) प्रास्ताविक

31. एकाच साधनाचा संदर्भ जेव्हा लागोपाठ येतो तेव्हा -------हा अधोरेखित शब्द योजावा ?
    (A) तत्रैव
    (B) उनि
    (C) टिपा
    (D) तळटिपा

32. समाजात विविध प्रकारच्या विवाह पध्दती कशा अस्तित्वात आहेत यांचा अभ्यास करण्यासाठी कोणती संशोधन पध्दती उपयोगी ठरते ?
    (A) ऐतिहासिक (B) शास्त्रीय
    (C) विस्तरण (D) पृथक्करण

33. -------हा शोधनिबंधाचा गाभा आहे?
    (A) संकेत (B) कौशल्य
    (C) सुसंगती (D) युक्तिवाद

34. प्रबंध - शैलीत शब्द लाघव आणि अलंकार चातुर्यापेक्षा ------ महत्त्वाचे असते?
    (A) विचार (B) भावना
    (C) लेखन (D) मांडणी

35. "कार्यकारण संबंधाची पहाणी हा संशोधनाचा डोळा आहे" असे मत कोणी मांडले?
    (A) डॉ.दु.का.संत (B) स.ग.मालसे
    (C) मिलिंद मालसे (D) वसंत जोशी

36. सिंध्दांत मांडणे अथवा शोधून काढणे हे कोणत्या संशोधन प्रकाराचे उदिष्ट आणि कार्य असते ?
    (A) पायाभूत (B) उपयोजित
    (C) तात्विक (D) व्यावसायिक

37. चतुर्वर्गचिंतामणी या ग्रंथाचा रचियता कोण आहे
    (A) मोरोपंत (B) दासोपंत
    (C) हेमाडपंत (D) हरिपंत

38. यादवकालाची मर्यादा इ.स. १२०० ते इ.स. ------- अशी मानली जाते ?
    (A) १२५० (B) १३००
    (C) १४०० (D) १३५०

39. महानुभवांचे मराठी साहित्य ----- अभ्यासाला विशेष उपयोगी पडते ?
    (A) वर्णनात्मक (B) तुलनात्मक
    (C) ऐतिहासिक (D) सर्व पर्याय

40. शतकोटी अभंग रचण्याची प्रतिज्ञा कोणी केली ?
    (A) संत नामदेव (B) संत एकनाथ
    (C) संत ज्ञानेश्वर (D) संत तुकाराम

41. चौंडरस नावाच्या कन्नड कवीने खालील पैकी कोणता शब्द उपयोजिला ?
    (A) त्रिभंग (B) अभंग विठ्ठल
    (C) ओवी विठ्ठल (D) कृष्णविठ्ठल

42. 'रूक्मिणी स्वयंवर' या ग्रंथाचा कर्ता कोण?
    (A) दामोदर (B) नरेंद्र
    (C) केशीराजबास (D) भास्करभट्ट बोरीकर

43. ‘दृष्टांतपाठ’ या ग्रंथाची रचना सूत्ररुपाने कोणी केली ?
(A) नागदेवाचार्य (B) नरेंद्र
(C) केशीराजबास (D) म्हाइंभट

44. कोणत्या पंथात गद्य,पद्य, तत्त्वज्ञान, भाष्य, व्याकरण, स्थळवर्णन, प्रवासवर्णन इत्यादी वैशिष्यपूर्ण रचनाप्रकार हाताळले आहेत ?
(A) नाथ संप्रदाय (B) वारकरी संप्रदाय
(C) महानुभावीय संप्रदाय (D) रामदासी संप्रदाय

45. आदी – समाधी - तीर्थावळी लिहून संत नामदेवांनी कोणाचे चरित्र लिहिले ?
(A) संत ज्ञानेश्वर (B) संत तुकाराम
(C) संत रामदास (D) संत चोखामेळा

46. -------हा मराठी साहित्याचा उष: काळ होय?
(A) शिवकाळ (B) यादवकाळ
(C) बहामनीकाळ (D) सातवाहन काळ

47. साहित्य, कला व संस्कृती या क्षेत्रासाठीचा ‘कालिदास सन्मान’ कोणत्या राज्यामार्फत दिला जातो?
(A) महाराष्ट्र (B) गुजरात
(C) मध्यप्रदेश (D) कर्नाटक

48. ............. संशोधन अभ्यासासाठी परिकल्पना आवश्यक असेलच असे नाही.
(A) प्रमाणभूत (B) सहसंबंधात्मक
(C) प्रयोगात्मक (D) ऐतिहासिक

49. एखाद्या महाविद्यालयाचे दर्जा ठरविण्यासाठी संशोधनात कोणते साधन वापरावे लागेल ?
(A) विद्यार्थी मुलाखत (B) निरीक्षण
(C) पदनिश्चयन श्रेणी (D) वरील सर्व

50. वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या वाचन सवयींचा अभ्यास हा कोणत्या संशोधनाचा विषय आहे?
(A) सर्वेक्षण (B) मूलभूत
(C) प्रायोगिक (D) ऐतिहासिक

********